Revised Study Material S.Y.B.A. General 2 Philosophy
Title of the Paper : Philosophy And Good Life
Unit 2 : Some Conceptions of Good Life (Western Approach)
*Prof. Shriniwas Hemade, hodphilosophy@sangamnercollege.org, 9226563052*

---

Unit 2: Some conceptions of Good Life(Western Approach)
घटक 2 : सु - जीवनाच्या काही संकल्पना (पाश्चात्य दृष्टिकोन)

1 : सॉक्रेटीस आणि प्लेटो : ' सद्‌गुण हेच ज्ञान '.
2 : ॲरिस्टॉटल :
सद्‌गुणाधिष्ठित नीतिमीमांसा, सद्‌गुणाच्या संकल्पना,युडायमोनिय,इच्छाशक्तिची दुर्बलता
3 : एपिक्युरियनवाद : सुखवाद
स्टोईकवाद : नियतत्ववादी नीतिमीमांसा

---

## सॉक्रेटीस आणि प्लेटो : ' सद्‌गुण हेच ज्ञान '

### सॉक्रेटीसचे विवेकाधिष्ठित नीतिशास्त्र

सॉक्रेटीसला ज्ञानाची आराधना करावयाची होती.पण केवळ ज्ञानाकरिता ज्ञान ही त्याची हटवादी भूमिका नव्हती.ज्ञानाने माणसाचे नैतिक आचरण व जीवन पवित्र आणि उच्च पातळीवर जावे, याबाबत तो आग्रही होता. आपण किती व कसे बुध्दिमान आहोत, याचा अहंकार माणसाने दाखविणे, हा ज्ञानाचा गैरवापर आहेच, पण तो ईश्वराचा अधिक्षेप आहे ; असे त्याचे मत होते.ज्ञानामुळे व्यवहारात व प्रत्यक्ष जीवनात माणसांनी सदाचरणी व सत्शील बनावे, ही त्याची अपेक्षा होती.*' कोणताही माणूस स्वेच्छेने चूक करीत नाही '* असे त्याचे म्हणणे होते. त्याच्या या मध्यवर्ती भूमिकेतूनच त्याचे नीतिशास्त्र विकसित होते.

सद्‌गुण म्हणजे ज्ञान असे समीकरण सॉक्रेटीस मांडतो.आता ज्ञान कशाचे बनते ? सद्‌गुण म्हणजे नेमके कोणते गुण ? असे प्रश्न उपस्थित होतात.

### ज्ञान आणि सद्‌गुण एकच

सॉक्रेटीसच्या मते ज्ञान केवळ संकल्पनांचे असते आणि ज्यामुळे माणूस सद्‌गुणी होतो अशा त्या संकल्पना आहेत.ग्रीकांच्या मते प्रज्ञान (Wisdom शहाणपण), धैर्य (Courage) दूरदर्शीपणा (Prudence), आत्मसंयम (Self-control) अशा मुख्य चार संकल्पनांचा (आणि त्यासारख्या इतर संकल्पनांचा ) सद्‌गुणांमध्ये समावेश होतो.ज्यास आपण सद्‌गुण समजतो अशा प्रकारच्या सर्व कृतीमध्ये हे चार सद्‌गुणघटक समान असतात.

आता, हे चाही सद्‌गुण वेगवेगळे आहेत का ? तर सॉक्रेटीसच्या मते "सर्व सद्‌गुण याचा अर्थ एकच गोष्ट आणि ती म्हणजे ज्ञान" *(All virtues are one thing and the thing is knowledge )* याचा अर्थ असा की या चारही सद्‌गुणांमध्ये जरी सकृतदर्शनी वेगळेपण दिसले तरी ते परस्परांशी इतके निगडीत आहेत की ते भिन्न नसून एकच आहेत ! ज्ञान ही ज्ञानाच्या घटकांची सुव्यवस्थित एकता आहे. ती सत्याची रचना आहे आणि त्यामुळेच तिचे सर्व घटक परस्परांशी सुसंगत असतात.परिणामी हे सर्व चारही सद्‌गुण म्हणजे एकाच सद्‌गुणाला दिलेली नावे आहेत. हे चार सद्‌गुण जाणणे म्हणजेच खऱ्या अर्थाने आपल्यासाठी शुभ काय आहे,

याचे व्यक्तिला अंर्तज्ञान[1] होणे होय. अंर्तज्ञानानेच मानवी आत्म्याचे आरोग्यरक्षण होते आणि जीवनात संगीत निर्माण होते.त्या आत्म्याचा सन्मान आणि प्रतिष्ठा हीच महत्वाची आहे, असे त्याचे म्हणणे आहे.

ज्ञान होणे ही बौध्दीक घटना आहे. ती शहाणपणाची गोष्ट आहे.सॉक्रेटीसच्या मते एखाद्याजवळ एक सद्‌गुण असला तरी त्याच्याजवळ शहाणपणा असला पाहिजे, अन्यथा तो सद्‌गुणी असण्याचे व्यवस्थापन करु शकत नाही आणि शहाणपणा हा सद्‌गुण त्याच्याकडे असेल तर त्याच्याकडे इतरही सद्‌गुण असलेच पाहिजेत; कारण शहाणा असल्यामुळेच त्याला हे कळेल की इतर सद्‌गुण अंगी बाळगले नाही तर तो सुखी होणार नाही ! सुख हे भौतिक नसून आत्म्याचे सुख असते. सुखी होणे तर जीवनाचे उद्‌दिष्ट असते.जो माणूस या रितीने सुखी होत नाही तो जणू काही आध्यात्मिक चूक करीत असतो ! [2]

ज्ञान आणि सद्‌गुण या दोन वेगळ्या गोष्टी नसून एकच आहेत.याचा अर्थ असा की 'खरा प्रज्ञानी माणूस तोच की जो योग्य काय आहे, हे जाणतो आणि म्हणूनच योग्य तीच कृती करतो.' जाणणे आणि कृती करणे एकच आहे, हे जाणून कृती करणे हा सद्‌गुण होय.

याचाच अर्थ असा की कुणीही जाणूनबुजून वाईटाची निवड करीत नाही,ती अजाणतेपणी ( योग्य काय हे न जाणल्यानेच ) घडणारी गोष्ट आहे. या भूमिकेला '*नैतिक विवेकवाद*' (ethical intellectualism)[3] म्हंटले आहे.तेव्हा सद्‌गुण म्हणजे ज्ञान आणि दुर्गुण म्हणजे अज्ञान होय. सद्‌गुण व ज्ञान यांची एकात्मता पाहता सद्‌गुणांचे ऐक्य कसे होते ? हा मुद्‌दा उपस्थित होतो. सॉक्रेटीसच्या मते सद्‌गुणांचे ऐक्य हीच सर्वोत्तमता होय.

## सर्वोत्तमता (excellence) :

साधारणपणे असे समजले जाते की मानवी सर्वोत्तमता कला, साहित्य, संगीत, धर्म, ईश्वर, भक्ति अशा अनेक गोष्टीमध्ये दडलेली असते.ती केवळ ज्ञानात नसते.पण सॉक्रेटीसच्या मते मानवी सदगुण हीच मानवाची सर्वोत्तमता असते.प्रज्ञान,धैर्य,दूरदर्शीपणा,आत्मसंयम या चार सद्‌गुणांचा समूह हीच सर्वोत्तमता (excellence) असते.

सर्वोत्तमता केवळ ज्ञानातच ती दडली आहे, असे सॉक्रेटीस का म्हणतो ?[4] एखादा कारागिर आणि नवशिका यात फरक काय असतो ? तर "नेमके काय आणि कसे" करावे लागेल याचे ज्ञान कारागिराकडे असते, ते नवशिक्याकडे नसते.'काय आणि कसे' हे जाणणे म्हणजे तंत्र[5] जाणणे होय. तेच तंत्र नीतीतज्ञाकडे असते.मानवी सर्वोत्तमता ही नैतिक कारागिरीच असते.ते एक तंत्रच असते.जसे डॉक्‌टरला मानवी शरीराची रचना आणि निरोगीपणासाठी काय करावे लागेल याचे ज्ञान असते; त्याप्रमाणे नीतितज्ञाला नीतीचे ज्ञान असते.व्यक्ती व समाज यांचे नैतिक आरोग्य राखण्यासाठी काय करावे लागेल, याचे भान नीतीतज्ञाकडे असते. सर्वोत्तमतेचे तंत्रज्ञान नीतीतज्ञाला असते. आणि तेच ज्ञान तो इतरांना देवू इच्छित असतो.

थोडक्यात सॉक्रेटीस असे दाखवितो की सामान्य लोक ज्याला नैतिक ज्ञान समजतात ते केवळ त्यांचे खासगी मत असते. कारण त्या मतात कोणतीही संकल्पना स्पष्ट केलेली नसते. उलट ज्ञान संकल्पनांनी बनते. ते

---

[1]फ्रेडरिक कोपलस्टन *'हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी'* पान 111

[2]अॅथंनी गॅाटलिएब - *दी ग्रेट फिलॉसॉफर्स : फ्रॉम सॉक्रेटीस टू ट्यूरिंग '* संपादक - रे मॉक आणि फ्रेडरिक राफेल ' फिनीक्स पेपरबॅक,पान 35, 2000

[3]फ्रेडरिक कोपलस्टन *'हिस्ट्री ऑफ फिलॉसॉफी'* पान 109

[4]'नॉर्मन मेलशेट *'दि ग्रेट कॉन्व्हर्वसेशन'* पान 67 पाचवी आवृत्ती 2007 ऑक्सफर्ड युनिर्व्हसिटी प्रेस.

[5]Techne या मूळ ग्रीक शब्दाचा अर्थ तंत्र.त्यापासूनच technology - तंत्रज्ञान हा शब्द बनतो.तोच नीतीच्या ज्ञानासाठी सॉक्रेटीसला अभिप्रेत आहे,असे नॉर्मन मेलशेट यांचे मत आहे.

वस्तुनिष्ठ, सत्य व सार्वजनिक असते.आणि ते नेहमीच सद्‌गुणांचे असते. सर्वोत्तमता व्यक्त होण्यासाठीच व्यक्तीला आत्मज्ञान होणे आवश्यक आहे.ते ज्ञान लाभले की सद्‌गुणाचे खरे ज्ञान होते.चांगली कृती होण्यासाठी सद्‌गुणाचे ज्ञान असावेच लागते.

ज्ञान म्हणजेच सद्‌गुण असे म्हणताना सॉक्रेटीसच्या मनात कोणत्याही प्रकारचे सामान्य दर्जाचे ज्ञान अपेक्षित नव्हते.त्याच्या म्हणण्याचा अर्थ होता की ज्ञान होणे याचा अर्थ सुबुध्द व्यक्तीला *अंत:प्रेरणेतून वास्तव अर्थाने योग्य काय ते पटणे* होय. येथे 'योग्य' याचा अर्थ पाहिला पाहिजे. त्याच्या मते तीच कृती योग्य असते जी माणसाला खऱ्या अर्थाने फक्त आणि फक्त उपयुक्तच असते ! आणि ज्ञानाची उपयुक्तता माणसाला सुख प्राप्त करवून देणे, या खेरिज अन्य काहीही असू शकत नाही. हाच ज्ञानाचा हेतू असतो !!

## ज्ञानाचा हेतू : सद्‌गुण म्हणजे सुख (Virtue is happiness)

सॉक्रेटीसच्या मते तीच कृती योग्य असते जी माणसाला खरी उपयुक्त ठरते.कृतीचा खरा उपयोग माणसाला सुख मिळण्यातच असतो.सुखाचा लाभ हा सुजीवनाचा गाभा असतो.प्रत्येकाला सुख हवेच असते.पण प्रत्येक कृती सुखकारक असेलच असे नसते.दारुड्याला दारुत सुख मिळते.पण म्हणून सतत दारु पिणे सुखावह नसते.दारुलाच सुख मानल्याने तो व्यसनासक्त होतोच पण असा माणूस स्वत:ची ओळख विसरतो.माणसाची स्वत:ची ओळख विवेकशील प्राणी अशी असते.त्या आत्मपरिचयापासून व्यसनी माणूस दूर जात असतो.

स्वत:च्या विवेकशीलतेची ओळख विसरणे हे अज्ञान असून त्यापोटी माणूस वाईटाकडे झुकतो.स्वत:चे सुख कशात आहे, हे त्याने जाणले तर तो पिणार नाही.अर्थातच ही अंत:प्रेरणतून जाणवणारी गोष्ट आहे. तेंव्हा सद्‌गुण कशासाठी ? तर सद्‌गुण सुखासाठी.म्हणून 'सद्‌गुण म्हणजे सुख' [6] असा उपसिध्दान्त सॉक्रेटीस मांडतो.कारण योग्य म्हणजे उपयुक्त असते.उपयुक्तता सुखासाठीच असते.

पण सुख शरीराचे सुख का ? नाही. दारूचे सुख शरीरालाच मिळते, पण त्यात सुख नाही, असे सॉक्रेटीस म्हणतो. याचे कारण सुखाचा लाभ शरीराशिवाय अन्य कोणाला तरी होत असतो. ते अन्य काही म्हणजे आत्मा होय. सॉक्रेटीस आत्म्याचे अस्तित्व स्वीकारतो. ज्ञानाचा फायदा आत्म्याला होतो. त्याच्या मते विवेकशक्ती ही आत्म्यात निवास करते.प्रत्येक व्यक्तीत आत्मा असतो.आत्मा हा बौध्दिक आणि नैतिक व्यक्तीत्वाचा असा घटक आहे की जो जाणणे आणि त्याप्रमाणे कृती करणे यांना जबाबदार असतो.आत्मा हेच व्यक्तिचे सारतत्त्व असून व्यक्तीची विवेकशीलता आत्म्यातूनच प्रकट होते.सद्‌गुणी असणे याचाच अर्थ आत्म्याचे आरोग्य सांभाळणे असते. आणि प्रत्येकाला सुख हवे असते. याचाच अर्थ सद्‌गुणाचा फायदा प्रत्येकाला होवू शकतो.चांगलेपणाचे ज्ञान असणे म्हणजे शुभकृती करणे. म्हणून तो सद्‌गुण म्हणजे ज्ञान किंवा
विवेकशीलता असे समीकरण घालतो.

## ज्ञानाचे साधन : विवेकशक्ती

पण सद्‌गुणांचे ज्ञान कोणत्या साधनाने होते ? तर ज्ञानाचे एकमेव साधन आहे माणसाची सदसद्‌विवेकशक्ती !! विवेकशक्ती ही नीतीचे परमोच्च साधन आहे. विवेकशक्तीच्या साह्यानेच माणसाने परीक्षण केले पाहिजे.सॉक्रेटीसच्या मते माणसाचे शरीर पंचमहाभूतांनी बनले आहे, हे बरोबर आहे.पण विचार करणारे मानवी मन किंवा विवेकशक्ती कशाने बनते ? तर त्याच्या मते या विश्वात एक व्यापक सर्वहित साधणारी

[6] गो.वि. तुळपुळे *ग्रीक तत्त्वज्ञान* पान 283

विवेकशक्ती आहे. आणि मानवी विवेकशक्ती ही एका वैश्विक मनाचा[7] म्हणजे एक वैश्विक विवेकशक्तीचा हिस्सा आहे.

## सद्‌गुणांचे शिक्षण

आता शिकवून माणूस सद्‌गुणी होवू शकतो का ?  तर ते शक्य आहे.ज्ञान किंवा शहाणपण शिकविणे शक्य आहे,याचा अर्थ सद्‌गुणांची शिकवणेही शक्य आहे.सद्‌गुणाचा अर्थ बौध्दिकदृष्ट्या शिकविणे शक्य आहे, पण खुद्‌द सद्‌गुण शिकविणे शक्य आहे का ? सॉक्रेटीसच्या मते जर माणसाची ज्ञान अंत:प्रेरणेतून जाणवत असेल तर सद्‌गुणही शिकविता येतात. पण शिकविणे म्हणजे व्याख्यानबाजी करणे नाही तर सॉक्रेटीक पध्दतीने व्यक्तीला अंत:प्रेरणेकडे घेवून जाणे होय. अंत:प्रेरणा हे विवेकशक्तीचेच नाव आहे. याचाच अर्थ जशी कारागिरी शिकविता येते तसे सद्‌गुण शिकविता येतात.

## विवेकाधिष्ठित नीतिशास्त्र

नैतिक निर्णय घेतान माणसाने विवेकाच्या आधारेच घ्यावा, अशी भूमिका सॉक्रेटीसने मांडली. हीला विवेकाधिष्ठित नीतिशास्त्र म्हणतात.ती नंतर प्लेटो आणि ॲरिस्टॉटलने विकसित केली.सॉक्रेटीसचे नेमके मुद्‌दे पुढीलप्रमाणे :

1) आपला नीतिविषयक निर्णय भावनाधारित नसावा. उलट समस्येचे परीक्षण करावे आणि विचारपूर्वक सर्वोत्तम निर्णयाकडे यावे.
2) वस्तुस्थितीचा सरळ निर्भिडपणे स्वीकार करावा आणि आपले मन स्वच्छ आणि पूर्वग्रहरहित असावे.
3) सर्वसाधारणपणे लोकांना काय वाटते, त्या आधारे नैतिक चर्चा करू नये. कारण लोकांची मते चुकीची असू शकतात !
4) जो प्रश्न स्वत:ला उचित वाटतो त्याचेच उत्तर शोधावे.
5) अखेरिस नैतिकदृष्ट्या चुकीची असणारी कोणतीही गोष्ट कधीही करु नये.आपण फक्त असाच विचार करावा की प्रस्तुत निर्णय योग्य आहे की नाही ! त्याविचारानुसार कृती केल्यानंतर आपले काय होईल, आपल्यावर काय परिणाम होईल किंवा लोक काय म्हणतील किंवा पूर्वी जे काही घडून गेले आहे, त्याबाबत आपल्याच काय वाटेल, याविषयी कसलाही विचार करु नये.

## साध्यसाधनवाद

वेगळ्या भाषेत सांगावयाचे तर सॉक्रेटीसच्या मते जग किंवा कोणतीही वस्तू स्वत:हून चांगली किंवा वाईट नसते.तर चांगलेपणाचे आपले ज्ञान तिला चांगले बनविते किंवा चांगलेपणाविषयीचे अज्ञान तिला वाईट बनविते.(जगात चांगले किंवा वाईट असे काही नसते,आपला विचार तसे बनवितो, असे 16 व्या शतकातील इंग्लीश नाटककार शेक्‌सपीअर म्हणतो.) ती वस्तू साधन म्हणून वापरावी की साध्य म्हणून वापरावी, याचा निर्णय विवेकशक्ती घेत असते.

सर्वसाधारण माणसे साधनमूल्ये आणि साध्यमूल्ये यात फरक करीत नाहीत. साधनालाच ते साध्य समजतात आणि साध्य मग आणखी दूर जाते.संपत्ती, सत्ता,मान, प्रतिष्ठा इत्यादी साधने आहेत.तर प्रज्ञान, धैर्य,दूरदर्शीपणा, आत्मसंयम ही साध्ये आहेत. पण अज्ञानामुळे साधनसाध्यात गोंधळ घालून माणसे जीवनाची पातळी बिघडवितात.

## परीक्षण :

---

[7] या विश्वात एक सर्वव्यापी मन आहे, ही संकल्पना सर्वप्रथम ॲनाक्झिमेंडर (इ.स.पू.612 ते 547) या तत्त्ववेत्त्याने मांडली होती. सॉक्रेटीसने ती त्याच्यापासून घेतली. तिचा मानवी मनाशी संबंध जोडून त्याने नीतीला भक्कम पाया दिला.

सॉक्रेटीसने कोणतेही नवे तत्त्वज्ञान मांडले नाही पण तत्त्वज्ञान निर्माण करावयाचे असेल तर काय करावे लागेल,नव्या वादाची किंवा शास्त्राची उभारणी करावयाची असेल तर काय करावे लागेल याची शिकवण त्याने दिली. त्यामुळे त्याच्या तत्त्वज्ञानास *'तत्त्वज्ञानाचे तत्त्वज्ञान'* (The Philosophy of Philosophy) असे म्हणतात.त्याच्या मते ज्ञानावर प्रेम करणे हेच तात्त्विकीकरण (Philosophize) असते.

सॉक्रेटीसने नीतिशास्त्र आणि ज्ञानशास्त्र यांचे एकीकरण केले. ज्ञान व सद्‌गुण एकच मानून त्याने ज्ञानात असलेला कोरडेपणा नाहीसा केला, त्याचवेळी नीतिला ज्ञानाची प्रतिष्ठा मिळवून दिली.

### प्लेटो : सद्‌गुण म्हणजे ज्ञान

### ज्ञानाची संकल्पना : मत व ज्ञान

ज्ञान म्हणजे काय ? हे स्पष्ट करण्यासाठी प्लेटो मत व ज्ञान यात फरक करतो.त्याच्या मते मत इंद्रियानुभवावर अवलंबून असते आणि ज्ञान हे संकल्पनांचे असते.मत व्यक्तीगत,खासगी असते.मत जगाविषयीचे असते. जग सतत बदलते, परिणामी मतही सतत बदलते. असे बदलते मत सत्यज्ञान देवू शकत नाही. उलट ज्ञान सार्वजनिक व वस्तुनिष्ठ असते.

**ज्ञान हे संकल्पनांचेच**

प्लेटोच्या मते ज्ञान हे नेहमी संकल्पनांचेच असते.ते इंद्रिय संवेदनांचे नसते.संवेदना व्यक्तिगणिक बदलतात.त्या व्यक्तीनिष्ठ असतात.ज्ञान मात्र वस्तुनिष्ठ व सार्वत्रिक असतात.त्या सर्वांसाठी सर्वांना लाभणाऱ्या असतात.सर्वांना होणारे ज्ञानाचे दर्शन एक आणि एकमेवच असते.ते सत्याचे ज्ञान असते.सत्य हा ज्ञानाचा विषय असतो.ते संकल्पनांद्वारेच अभिव्यक्त होते.असे वस्तुनिष्ठ सत्य एकच आहे ते म्हणजे सद्‌गुण होय, असे तो म्हणतो.

## 2.2: ॲरिस्टॉटलचे नीतिशास्त्र ( सद्‌गुणाधिष्ठित नीतिमीमांसा )

ॲरिस्टॉटलचे जीवन :

ॲरिस्टॉटल Aristotle
(384 - 322 BC)
Greek philosopher and polymath,
a student of Plato
and
Teacher of Alexander the Great.



ॲरिस्टॉटल हा असामान्य बुध्दीचा व तर्कशुध्द रीतीने विचार करणारा महान् तत्वज्ञ होऊन गेला. सॉक्रेटीस, प्लेटो आणि ॲरिस्टॉटल अशी पाश्चात्य गुरु - शिष्य परंपरा आहे. सॉक्रेटीस हा आद्यगुरु असून प्लेटो त्याचा शिष्य होता आणि ॲरिस्टॉटल प्लेटोचा.

तथापि सर्व ज्ञानाची सुव्यवस्थित रचना करण्याचा आणि ज्ञानाला वैज्ञानिकतेचा दर्जा देण्याचे महान कार्य ॲरिस्टॉटलनेच केले. आज ज्ञात असलेले सारे विज्ञान व वैज्ञानिक पध्दतीची मांडणी त्याने केली. या अर्थाने

ॲरिस्टॉटल हा जगातील पहिला आचार्य समजला जातो. महाकवि डांटे[8] याने ॲरिस्टॉटलचा गौरव *'ज्ञानियांचा राजा'* या उक्तीत केला आहे. प्लेटो व डेमोक्रिटस यांचा ॲरिस्टॉटलने समन्वय केला असें म्हणतां येईल. ज्यास खऱ्या अस्सल अर्थाने गुरु (Master) हणता येईल, असा ॲरिस्टॉटल हाच जगातील पहिला Master[9] आहे.

ॲरिस्टॉटलचा जन्म थ्रेस प्रांतातील स्टगिरस या शहरी इ स़. पू. 384 मध्ये झाला. इ. स. पू. 367 मध्ये ॲरिस्टॉटल प्लेटोच्या ॲकॅडेमींत दाखल झाला. तेथे त्याने वीस वर्षे (प्लेटोच्या निधनापर्यन्त) अध्ययन केले. प्लेटोच्या मृत्यूनंतर मात्र तो लगेच ॲटेनिअसचा राजा हर्मिअस याच्या दरबारी तीन-चार वर्षे जाऊन राहिला. त्यानंतर मॅसिडोनियाचा राजा फिलिप, याच्या निमंत्रणावरुन राजपुत्र ॲलेक्झँडर (ॲलेक्झँडर दि ग्रेट) याचा शिक्षक म्हणून त्याने इ.स.पू.342-335 असें सात वर्षे काम केलें. ॲलेक्झँडेरने आपलया पूर्वेकडील स्वा-या सुरु केलयावर तो ॲथेन्सला परतला व त्याने Lysium लिसिअम नांवाचें आपलें स्वतंत्र विद्यापीठ स्थापन केले. ह्या विद्यापीठांत त्याने 12-13 वर्षे अध्यापन केलें व विद्यापीठाचें सर्व कामकाज पाहिले. शिष्यांसमवेत बागेतून येरझारा घालीत शिकविण्याच्या त्याच्या पध्दतीमुळे त्याच्या पंथाला *पेरिपॅटेटिक स्कूल* Peripetetic School किंवा *येरझा-या संप्रदाय* असे नांव पडलें. ॲलेक्झँडरच्या मृत्यूनंतर त्याने यूबियामधील कॅन्सिस गावीं पळ काढला व तेथेच तो इ.स.पू.322 मध्ये मरण पावला.

ॲरिस्टॉटलच्या जीवनांत एकूण तीन महत्वाचे कालखंड दिसून येतात :

(1) प्लेटोच्या विद्यापीठांतील काळ

(2) संक्रमणाचा काळ : ॲसस, मिटोलीन व मॅसिडोनियाचा दरबार येथील अध्यापनकार्य

(3) ॲथेन्समधील लिसिअम विद्यापीठाचा प्रमुख म्हणून घालविलेला काळ.

## ॲरिस्टॉटलने केलेले ज्ञानाचे प्रकार

ॲरिस्टॉटलच्या मताप्रमाणे ज्ञानाचे तीन मुख्य प्रकार असतात :

1) तात्विक ज्ञान (Theoretical Philosohy)
2) व्यावहारिक तत्वज्ञान (Practical Philosophy)
3) उत्पादक ज्ञान (Productive Philosophy).

तात्विक ज्ञान त्याच्या स्वत:साठीच (ज्ञानासाठी ज्ञान ) असते, व्यावहारिक तत्वज्ञान माणसाला विशिष्ट कृतीप्रत नेणारे असते तर उत्पादक ज्ञान उपयुक्त अथवा सौंदर्यपूर्ण गोष्टींची निर्मिती करणारे असते. ॲरिस्टॉटलच्या मते सर्वश्रेष्ठ स्वरुपाचे व्यावहारिक ज्ञान म्हणजे 'राज्यशास्त्र (Politics)' होय.[10] आणि नीतिशास्त्र ही खरे तर राज्यशास्त्राची एक महत्वाची उपशाखा होय. त्यामुळेच ॲरिस्टॉटल नीतिशास्त्राबद्दल विशेष रुपाने

---

[8]डांटे अलिघिएरी Durante degli Alighieri (1265–1321). मध्ययुगीन इटालियन महाकवि. त्याचे *डिव्हाईन कॉमेडी Divine Comedy* हे अतिशय सुप्रसिध्द गाजलेले काव्य आहे. डांटेला इटालीत *Sommo Poeta* (the Supreme Poet) ही पदवी मिळाली. ' इटालियन भाषेचा पितामह' (Father of the Italian language)या नावाने डांटेचा गौरव केला जातो.

[9]*Inferno* या *Divine Comedy* च्या पहिल्या भागात डांटे ॲरिस्टॉटलचा "The master of those who know" (*Inf.* 4.131) असा गौरव करतो. तर अन्यत्र तो ॲरिस्टॉटलचा उल्लेख केवळ "the Philosopher" असा करतो. Master या संज्ञेस ग्रीक भाषेत polymath असे म्हणतात, त्याचा अर्थ "having learned much".

[10]आजच्या काळातील माणसाच्या राज्याव्यतिरिक्त (State), इतर संस्थांच्या सभासदत्वामुळे आपण या शास्त्रास समाजविज्ञान म्हणून शकतो.

स्वतंत्ररित्या काहीच लिहीत नाही. *'चारित्र्याचा अभ्यास'* अथवा *'चारित्र्याविषयक चर्चा'* या स्वरुपात सारी नीतिशास्त्रविषयक चर्चा मांडतो.

ॲरिस्टॉटलच्या या राज्यशास्त्राचे दोन भाग पडतात, 'नीतिशास्त्र' व 'राजकारण'.त्याच्या नीतिशास्त्रानुसार कोणतीही व्यक्ती अनिवार्यपणे समाजाचा घटक असते आणि राजकारणानुसार कोणत्याही राज्याच्या आयुष्याचा दर्जा हा त्याच्या नागरिकांच्या जीवनांच्या दर्जावर अवलंबून असतो.

व्यावहारिक तत्वज्ञानावर (Practical Philosophy) ॲरिस्टॉटलने 'निकोमॅकियन एथिक्स' व 'पॉलिटिक्स' या दोन पुस्तकांचे लेखन केले.कृतीची परिणामकारकता कशी साधावी? हे या ग्रंथांचे प्रमुख ध्येय आहे.त्यामुळे कृतीचा कर्ता म्हणून माणसावर काय अवलंबून आहे, व काय नाही, त्याचप्रमाणे असे काय आहे की जे तो बदलू शकत नाही याचाही उहापोह या पुस्तकात केलेला दिसतो.त्याच्या मते एकूणच नीतिशास्त्रीय चर्चांचा हेतू एक सुयोग्य कर्ता निर्माण करणे हाच आहे.

ॲरिस्टॉटल स्पष्टपणे लिहितो की - ' मी निकोमॅकियन एथिक्स लिहिण्याचे कारण, 'सद्गुण म्हणजे काय' हे जाणण्याची इच्छा नव्हे, तर चांगले बनणे (to become good) ही होय'.चांगल्या निवडी करण्यातून व चांगल्या कृतींतून व्यक्ती चांगली बनते.परंतू चांगली निवड व चांगली कृती करणे एवढेच येथे पुरेसे नाही.तर कोणत्या पध्दतीने, रितीने, दष्टिकोनामधून आपण या निवडी करतो, हेच फार महत्वाचे असते.''[11]

## *युडेमोनिया Eudamonia*

ॲरिस्टॉटलला 'केवल शुभ' (absolute good) या संकल्पनेत फारसा रस नव्हता. प्रत्येक निवडीचे व कृतीचे फलित अखेर माणसाचे शुभ हेच असते. हे शुभ म्हणजे चांगले जीवन होय. या चांगल्या जीवनास ॲरिस्टॉटलने *युडेमोनिया*[12] [13] असे नाव दिलेले आहे.

काय प्रकारचे आयुष्य आहे युडेमोनिया म्हणजे ? ॲरिस्टॉटल सांगतो की माणसे सर्वसाधारणतः चार प्रकारच्या आयुष्यांची निवड करतात.ती अशी :

1) ऐंद्रीय सुखाचे जीवन (pleasure) : हे तर पशुंचे (अथवा गुलामांचे) ध्येय असते.
2) मानसन्मानाचे जीवन (honour): सामान्यजन, गुलाम यांच्याहून श्रेष्ठ माणसांचे ध्येय.
3) संपत्तीयुक्त जीवन (wealth) : ऐंद्रीय सुखाचे , मानसन्मानाचे साधन.
4) 'युडेमोनिया' : चिंतनशील जीवन (Contemplative life): हे मानवी जीवनाचे साध्य.

इंद्रीय सुख हे पशुंचे जीवन असते.'माणसातील पशु' म्हणून ते गुलामांचे जीवन असते.दुसरे, मानसन्मानाचे जीवन हे ब-याचदा राजकीय जीवनाचे ध्येय असते.पण मान हा घेणाऱ्यापेक्षा देणाऱ्याच्या मर्जीवर / मनावर अवलंबून असतो.तो निश्चितपणे मिळेल,याची शाश्वती नसते. विकत घेतलेला मानसन्मान बाजारु असतो.

---

[11]ॲरिस्टॉटलच्या मते अगदी दुष्टबुध्दी माणसांचा अपवाद सोडल्यास बहुतेकांना ''आपण नैतिक दृष्ट्या कसे वागणे आवश्यक आहे ''हे ठाऊक असते.

[12] युडेमोनियाचे इंग्रजी भाषांतर happiness, म्हणजे सुख, आनंद असे सहसा केले जाते.परंतु या भाषांतरामध्ये एक समस्या आहे. सुख, आनंद या सा-या प्रामुख्याने भावनिक अवस्था आहेत, तर युडेमोनिया हे कृतीमय आहे असे ॲरिस्टॉटल वारंवार सांगतो. युडेमोनिया स्वतः सुखयुक्त नाही. तरीही सुख त्याच्या जोडीने चालत येते हे नक्की.

[13]'आत्मकल्याण ' असे भाषांतर प्रा. श्रीनिवास दिक्षित करतात.नीतिमीमांसा -मराठी तत्त्वज्ञान महाकोश मंडळ प्रथमावृत्ती 1982, पान 98, Eudamonism आत्मकल्याणवाद

त्यास स्वयंमूल्य आणि नैतिक मूल्य नसते.तिसरे, संपत्तीमय जीवन सुध्दा नैतिक मूल्य असणारे असेलच असे नाही.लोक सतत संपत्तीच्या मागे असतात.परंतु संपत्ती हे एक साधन असते. ते जीवनाचे साध्य असू शकत नाही !

ॲरिस्टॉटलच्या मते चवथ्या पध्दतीचे जीवन 'चिंतनशील जीवन' (Contemplaive life) हेच खरे मानवी जीवनाचे साध्य आहे.त्याच्या मते दोन अटी आहेत :

(1) मानवी जीवनाचे साध्य हे आत्ममूल्य असणारे स्वंयपूर्ण असावे.
(2) त्याला 'साध्य' म्हणून मान्यता देण्यासाठी बाह्य आधारांची आवश्यकता नसावी.म्हणजेच त्यायोगे मानवी जीवन जगण्यालायक बनले पाहिजे.

त्याच्या मते जीवनाचे सर्वोच्च ध्येय हे अशा प्रकारचे अंतिम साध्य असले पाहिजे की जे इतर कशाहीसाठी साधन म्हणून वापरले जाऊ शकणार नाही.आणि जे लाभल्यानंतर अन्य काही मिळवावे, असे शहाण्या माणसाला वाटणार नाही ! सर्वोच्च ध्येय हे त्या ध्येयासाठीच निवडलेले असले पाहिजे.

## आनंद किंवा सुख :

आनंदीपणा अथवा सुख या दोन्ही गुणधर्मांनी 'चिंतनशील जीवन' भरलेले असते.सुख हेच ध्येय असते. सुख म्हणजे समाधान.आनंद, सुख हेच सर्वोच्च ध्येयाच्या सर्व कसोट्यांवर खरे उतरतात. आता आनंद अथवा सुख - समाधान म्हणजे काय ? हा प्रश्न विचारता येईल.हा जटील प्रश्न आहे खरा.

या प्रश्नाचे उत्तर शोधताना ॲरिस्टॉटल 'कार्य' (function) अथवा काम (Work) या संकल्पनांचा आधार घेतो.कोणत्या प्रकारचे आयुष्य माणसास सर्वाधिक सुखी करेल ? हे शोधण्यासाठी माणसाचे व्यवच्छेदक 'कार्य' कोणते हे पाहणे गरजेचे आहे, असे त्याचे मत आहे. त्याच्या मते विश्वातील प्रत्येक वस्तू अथवा सजीवास काहीएक कार्य असते.जसे की बासरी वादकाचे कार्य बासरीवादन असते. कुऱ्हाडीचे कार्य तोडणे हे असते. त्याचप्रमाणे शरीराच्या भागांची, जसे की डोळ्याचे कार्य पाहणे आहे. आता ही कार्ये सांगणे अगदीच सोपे आहे.

## विवेकशीलता (Rationality) :

पण माणसाचे कार्य काय ? याचे उत्तर अवघड आहे. ॲरिस्टॉटल याचे उत्तर केवळ अशाच कार्यात शोधू पाहतो की 'जे कार्य केवळ मानवच करु शकतो'.त्याच्या मते वंशवाढ व प्रजेचे पुनरुत्पादन या गोष्टी प्राणी व वनस्पतींमध्येही आढळतात.म्हणजेच माणूस आणि वनस्पती यांच्या जीवनात पोषण आणि विकास या दोन गोष्टीचे साम्य आहे.तसेच शारीरिक संवेदना म्हणजे इंद्रियसंवेदन (Sense Perception) ही मानवी जीवन आणि मानवेतर प्राण्यांचे जीवन यांचे समान लक्षण असते. परंतु स्वत: निश्चित केलेल्या नियमाबरहुकूम, किंवा आराखड्यानुसार कार्य करणे, हे फक्त माणूसच करु शकतो.ती त्याची विवेकक्षमता असते.म्हणजेच माणसाचे व्यवच्छेदक लक्षण म्हणजे त्याची विवेकशीलता (Rationality) होय.

विवेकाची निवड जाणीवपूर्वक केलेली असते.निवडीची क्षमता हीच मानवी क्षमता असते. '' माझे कल्याण कशात आहे ? '' याची जाणीव किंवा आत्महिताची निवड विवेकनिष्ठ तत्वानुसार माणूस करतो.ते इष्ट जीवन असते.म्हणून इष्ट म्हणजे संपूर्ण जीवनभर करावयाचे नैतिक आचरण.त्यालाच आत्मकल्याण म्हणावे. मानवाची ही विवेकक्षमता सुप्त नसून ती नेहमी क्रियाशील असते.

आनंद व सुख ही दोन उद्दिष्टे मानवी क्षमतेचा भाग असल्या पाहिजेत.'युडेमोनिया' चा हक्कदार असण्यासाठी ही विवेकशीलता संपूर्ण आयूष्यभर केवळ सद्गुणांशी अनुरुप असेच कृत्य करते. ते जीवन उत्कृष्ट जीवन असते.म्हणूनच 'युडेमोनिआ' म्हणजे सर्वोत्कृष्टरीत्या जगलेले समग्र जीवन.

**सद्‌गुणमीमांसा :** सद्‌गुणांना अनुसरुन असे जीवन जगणे ही आत्म्याची प्रवृत्ती असते.

युडेमोनिआ या शब्दाद्वारे व्यक्त झालेला अर्थ लक्षात घेवून त्या पार्श्वभूमीवर ॲरिस्टॉटलने त्याची सद्‌गूणांची कल्पना मांडली आहे.त्याच्या मते '' सद्‌गुण (Virtue) म्हणजे मनुष्याचा उत्कृष्ट स्वभाव (Virtue as excellence of character) '' ॲरिस्टॉटलची सद्‌गुणांची व्याख्या पुढीलप्रमाणे आहे:

*ज्याच्याजवळ व्यावहारिक शहाणपण आहे अशी व्यक्ती दैनंदिन जीवन जगत असताना जेव्हा बुध्दीच्या सहाय्याने परस्परविरुध्द टोकाच्या सापेक्ष असा मध्य निवडते तेव्हाची तिची स्वभावस्थिती म्हणजे सद्‌गुण. (Virtue[14] is a state of character concerned with choice , lying in a mean relatioveto us and as determined by which a man of practical wisdom would determine it.)*

आता, उत्कृष्ट स्वभाव म्हणजे नेमके काय ? व तो कसा सिध्द (व्यक्त) होतो ? हे दोन प्रश्न या संदर्भात उपस्थित करता येतील.त्यासाठी या व्याख्येतील महत्वाच्या संकल्पना म्हणजे - (1) स्वभावस्थिती (a state of character) (2) निवड (choice) (3) मध्य (mean) (4) बुध्दिनिष्ठ तत्व (rational principle) (5) व्यवहारोपयोगी शहाणपण असणारी व्यक्ती.(a man of practical wisdom )यांचे अर्थ पाहू :

सद्‌गुण म्हणजे स्वभावातील चांगलेपणा (excellence of character) किंवा स्वभावविशेष (a state of character) असे ॲरिस्टॉटल म्हणतो. हे त्याच्या म्हणण्यानुसार माणसाच्या प्रत्येक कृतीमधून त्याचा स्वभाव (character) आणि ती करण्यामागील इच्छा आणि भावना व्यक्त होत असतात. माणसातील राग,भीती,लोभ,विश्वास इत्यादी भावना किंवा इच्छा किंवा त्यांचा अभाव ह्या मुळात (in-itself) स्वभावातील चांगुलपणा किंवा स्वभावदोष या स्वरुपाच्या नसतात. पण कोणतीही भावना किंवा इच्छा एकाच समान परिस्थितीमधे एकाच पध्दतीने जेव्हा वारंवार व्यक्त होते तेव्हाच ती भावना किंवा इच्छा त्या माणसाचा स्वभावविशेष किंवा स्वभावस्थिती (disposition) बनते.

अशा स्वभावस्थितीचे जेव्हा जेव्हा बुध्दीने (reason) किंवा व्यावहारिक शहाणपणाद्वारे (practical wisdom) नियंत्रण होते तेव्हा ती इच्छा किंवा भावना स्वभावातील चांगुलपणा (excellence of character) या स्वरुपात

---

[14]सद्‌गुणाच्या ॲरिस्टॉटलप्रणीत संकल्पनेचा आशय समजावून घेण्यासाठी लॅटिन व इंग्रजीतील समानार्थक/भाषांतरित शब्दांच्या अर्थाकडे लक्ष देणे आवश्यक आहे.ते असे :

(अ) लॅटीन भाषेतील Virtus (व्हर्टूयस) चे इंग्रजी भाषांतर Virtue 'व्हर्च्यू'

(ब) ग्रीक भाषेतील Arete (आरेते) चे इंग्रजी भाषांतर Virtue 'व्हर्च्यू'. पण त्यांचे मूळ अर्थ वेगवेगळे आहेत. ते असे :

1) लॅटिन Virtus चा अर्थ : पौरुष (manliness), पराक्रम, (prowes) व शौर्य (valour).

2) इंग्रजीतील Virtue चा अर्थ : सदाचरण, नीतीचे आचरण, धर्माचरण.

3) ग्रीक arete चा अर्थ : कौशल्य (excellence), चांगलेपण (goodness).

सामान्यतः कौशल्य हे माणसाच्या अंगी असते तर चांगलेपण हे माणसाचा स्वभाव, त्याची कृती, प्राणी अथवा एखादी वस्तू यांच्या ठायी असते. पण माणसाच्या अंगी कौशल्य असणे ही चांगलेपण असण्याचाही एक घटक आहे. याचाच अर्थ 'कौशल्य आणि चांगलेपण' हे दोन्हीही घटक ग्रीक 'आरेते' या शब्दाच्या अर्थाचे समान घटक आहेत. म्हणून ग्रीक 'आरेते' चा अर्थ *'जे जे (म्हणजे व्यक्ती, वस्तू, प्राणी) त्याच्या त्याच्या स्वभावधर्माच्या व निहित कार्याच्या संदर्भात कौशल्यपूर्ण/ उत्कृष्ट / चांगले असते ते ते '* असा होतो. हा अर्थ इंग्रजीतील Virtue पेक्षा अधिक व्यापक आहे.

व्यक्त होते.पण जेव्हा असे घडत नाही तेव्हा तीच इच्छा किंवा तीच भावना स्वभावदोष (defect of character) या स्वरुपात व्यक्त होते. म्हणून स्वभावविशेष (state of character) म्हणजे विशिष्ट भावनेनुसार व्यक्त होणारा स्वभावातील चांगलेपणा किंवा दोष होय. उदाहरणार्थ भीती या भावनेच्या संदर्भात धैर्य हा चांगुलपणा तर भितरेपणा हा स्वभावदोष मानला जाईल.

स्वभावातील चांगलेपणा हा अनेक स्वभावविशेषांपैकी एक या स्वरुपाचा आहे. ॲरिस्टॉटलने चार स्वभाविशेष मानलेले आहेत.ते असे :

(1) स्वभावातील चांगलेपणा किंवा सद्‌गुण (Excellence of character किंवा virtue)

ज्याला योग्य रीतीने वागायचे आहे आणि जो बुध्दी आणि वासना/इच्छा यांच्यात कुठलाही आंतरिक संघर्ष न होऊ देता प्रत्यक्षात त्याप्रमाणे वागतो अशा माणसाचा सद्‌गुण हा एक स्वभाव विशेष असतो.

(2) इच्छाशक्ती (Strength of will)

योग्य काय आहे हे माहीत असूनही ज्याला अयोग्य पध्दतीनेच वागण्याची इच्छा होते पण तरीही जो स्वत:ला योग्य पध्दतीने वागण्यास भाग पाडतो अशा माणसाचा इच्छाशक्ती हा एक स्वभावविशेष असतो.

(3) इच्छादुर्बलता (Weakness of will)

योग्य काय आहे हे माहीत असूनही ज्याला अयोग्य पध्दतीने वागायची इच्छा होते पण (तरीही) जो योग्य पध्दतीने वागण्याचा प्रयत्न करतो, पण तसे करण्यात यशस्वी होत नाही अशा माणसाचा इच्छादुर्बलाता हा एक स्वभावविशेष असतो.

(4) दुर्गुण (Badness of character)

ज्याला जाणीवपूर्वक अयोग्य पध्दतीने वागायचे आहे आणि जो बुध्दी आणि वासना/इच्छा यांच्यात कुठलाही आंतरिक संघर्ष न होऊ देता अयोग्य पध्दतीने वागण्यात यशस्वी होतो, अशा माणसाचा दुर्गुण हा एक स्वभावविशेष असतो. सद्‌गुण विरुध्द दुर्गुण, इच्छाशक्ती विरुध्द इच्छादौर्बलय अशा या स्वभावविशेषांच्या जोडया आहेत.

## सद्‌गुणाची व्याख्या : "सद्‌गुण म्हणजे वर्तनाचा सुवर्णमध्य"

मानवी स्वभावविशेष लक्षात घेवून ॲरिस्टॉटल आता '' सद्‌गुण ही कशा प्रकारची वस्तु आहे '' , या प्रश्नाच्या नेमक्या उत्तराकडे वळतो. म्हणजे सद्‌गुण ही मानवी वृत्ती (Passion) आहे की माणसातील सुप्त क्षमता (Faculty) आहे ? कि चारित्र्याची एक विशिष्ट अवस्था आहे (State of character)? हा तो प्रश्न आहे.

ॲरिस्टॉटलचे प्रतिपादन असे की सद्‌गुण ही चारित्र्याची विशिष्ट अवस्था आहे.फक्त ती कशा प्रकारची अवस्था आहे ? तर ती मध्यमार्गी अवस्था आहे. पण याचा अर्थ असा नव्हे की ती दरवेळी दोन संभाव्य टोकांपासून समान अंतरावर असते. ती अवस्था म्हणजे कर्त्याच्या सापेक्ष असलेला सुवर्णमध्य असतो. त्याची व्याख्या अशी : *''सद्‌गुण ही चारित्र्याची अवस्था असून ती विवेकांनी निर्धारित आणि कर्त्याच्या सापेक्ष असलेलया मध्यमार्गाच्या निवडीमध्ये आहे. विवेकी तत्व म्हणजे व्यावहारिक सुज्ञपणा किंवा शहाणपण असलेलया व्यक्तीचे तत्व. ''*

पुढे ॲरिस्टॉटल 'सद्‌गुण म्हणजे वर्तनाचा सुवर्णमध्य' या तत्वाची उदाहरणे देतो.भय आणि साहस यांचा सुवर्णमध्य म्हणजे धैर्य होय. सुख व दु:खाचा सुवर्णमध्य म्हणजे संयम होय. त्याचप्रमाणे स्वातंत्र्य, योग्य

अभिमान, संयतवृत्ती हे सुध्दा सुवर्णमध्य आहेत.बढाईखोरपणा आणि खोटा विनय, असभ्यपणा आणि विदुषकी, नादिष्टपणा आणि भांडकुदळपणा, लज्जा आणि निलाजरेपणा अशा अनेक गोष्टीमधील मध्य तो सांगतो.पण त्या सुवर्णमध्यांना अधिकृत असे शब्द रुढ नाहीत.

## सद्‌गुणाच्या दोन अटी :

ॲरिस्टॉटलच्या मते कधी कधी 'सद्‌गुण हा टोकाकडे जास्त झुकलेला असतो. उदाहरणार्थ धैर्य हे साहसाकडे तर 'स्वातंत्र्य' औदार्यकडे.त्यामुळे कसे वागले म्हणजे सद्‌गुणांचे वर्तन केले असे होईल हे आधीच सांगता येत नाही.तो निर्णय प्रत्यक्ष परिस्थितीच्या आकलनानंतरच घेता येतो.त्यासंबंधीच्या अटी तो सांगतो.

पहिली अट अशी की जी वृत्ती किंवा वर्तन स्वतंत्र आहे आणि स्वेच्छेनी केलेले आहे, त्यामध्येच सद्‌गुण व्यक्त होतो.अनिच्छेनी केलेली वर्तने दबावाखाली किंवा अज्ञानापोटी केले जाते. म्हणजे जे आचरण करण्यामागे बाह्यपरिस्थितीचा दबाव असतो आणि नैतिक कर्त्याला ते आचरण करण्यासाठी कोणतेही प्रयोजन नसते, ते आचरण अनिच्छेने केलेले ठरते.

दुसरी अट अशी की वर्तनाबाबत कर्त्याला जाणीव असणे. म्हणजे स्वेच्छेनी केलेले आचरण ते की जे आचरण करण्यामागचे कारण हे कर्त्यामध्येच असते आणि त्याला विशिष्ठ परिस्थितीचे ज्ञान असते.म्हणून रागाच्या भरांत केलेले आचरण किंवा वासनेपोटी केलेले कृत्य हे नेहमीच अनैच्छिक कर्म समजले जावे.(वासना म्हणजे (appetite) भूक इत्यादीच्या इच्छा)

थोडक्यात, आचरण हे स्वेच्छेनी केलेले आहे हे ठरविण्यासाठी ते आचरण सक्तीने केलेले नसावे, आणि विशिष्ठ परिस्थितीचे ज्ञान कर्त्याला असले पाहिजे या आवश्यक अशा पूर्व अटी आहेत.विचारपूर्वक साध्यापर्यंत पोहोचण्यासाठी जे आचरण प्रथम आपण करण्याचे ठरवितो त्याची आपण योजना करतो.या विचारपूर्वक केलेलया योजनेला निवड (Choic) अशी संज्ञा ॲरिस्टॉटल देतो. उदाहरणार्थ सकाळी 9 ला निघण्यासाठी 2 तास जर सर्व आटपून तयार व्हायला लागत असतील तर 7 वाजता उठले पाहिजे.ही निवड होय

## सद्‌गुणांचे दोन मुख्य प्रकार :

सद्‌गुण संकल्पना ही मूलत: खुल्या स्वरुपाची आहे. ॲरिस्टॉटलने नैतिक आणि बौध्दिक असे सद्‌गुणांचे दोन मुख्य प्रकार केले आहेत व त्यामधे त्याने विविध सद्‌गुणांचा अंतर्भाव केला आहे.नैतिक आणि बौध्दिक या प्रकारात ज्या ज्या सद्‌गुणांचा अंतर्भाव ॲरिस्टॉटलने केला आहे ते एकजिनसी (homogenous) नाहीत.धैर्य, नेमस्तवृत्ती, व उद्यमशीलता, मातृपितृभक्ती,आज्ञाधारकपणा, न्याय यातील प्रत्येकाला सद्‌गुण मानण्याची कारणे किंवा दृष्टिकोन वेगवेगळे आहेत, असे तो स्पष्ट करतो.

## 3 : एपिक्युरियनवाद : सुखवाद

प्रस्तावना :

ॲरिस्टॉटलच्या पश्चात जे नवे संप्रदाय निर्माण झाले त्यात स्टोइक आणि एपिक्युरियन संप्रदाय समकालीन आणि प्रसिध्द आहेत. स्टोइक विरागी होते आणि एपिक्युरियन सुखवादी होते. तथापि या दोन्ही संप्रदायांनी तत्त्वचिंतनाच्या इतिहासात अत्यंत मोलाची भर घातली.पाश्चात्य परंपरेतील श्रमणवाद आणि इहवादाचा जणू त्यांनी पायाच रचला, असे म्हणता येईल.

## स्टोईकवाद : नियतत्ववादी नीतिमीमांसा

स्टोइक संप्रदायास पाचशे वर्षाचा प्रदीर्घ इतिहास आहे. मानवतेच्या आंतरिक जीवनाचे प्रश्न सोडवणारी एक *महत्वाची वैचारिक चळवळ* या दृष्टीने स्टोइकवादाकडे पाहिल्यास त्यांची कामगिरी खूपच महत्वाची समजता येईल.स्टोइकांच्या या तत्कालीन सुशिक्षित वर्गाने जुना धर्म व नवे तत्वज्ञान यांच्यामध्ये संवाद घडविण्याचा प्रयत्न केला. स्टोइकांनी ज्ञानाची जी सुव्यवस्थित मांडणी केली तशी पूर्वी कधीही कोणी केली नव्हती. स्टोइक्सनी नीतीला बुध्दिवादाचा भक्कम आधार उपलब्ध करुन दिला व त्यामुळे कधीही नव्हती अशी शास्त्रशुध्द प्रतिष्ठा नीतीला लाभली. हा नीतीला लाभलेला सैध्दान्तिक पाया होता.

### कालखंड व तत्वज्ञान :

स्टोइकवादाच्या पाचशे वर्षांच्या कालावधीचे तीन खंड केले जातात.

### (1)पहिला सिध्दान्ताच्या रचनेचा कालखंड :

अंदाजे इ.स.पू. 294 ते इ.स.पू. 206 पर्यंत. 90 वर्षे. या काळात या संप्रदायाचे तीन थोर अग्रणी होऊन गेले.ते म्हणजे झीनो (Zeno ख्रि.पू.340 ते ख्रि.पू.265), क्लीअॅन्थीस (Cleanthes ख्रि.पू.264 ते ख्रि.पू. 232) आणि ख्रिसिपस (Chrysippus ख्रि.पू.280 ते ख्रि.पू.206) हे होत. या कालखंडात सिध्दान्तांची रचना करण्यात आली.

### (2)दुसरा स्टोइकवादाच्या परिवर्तनाचा कालखंड :

अंदाजे ख्रि.पू.206 ते ख्रिस्तोत्तर 001. 200वर्षे. मूळचे स्टोइकवादाच्या उग्र सिनिकल; उपहासवादी स्वरुपात काळात बदल झाला तो काळ. या परिवर्तनाचा रोममध्ये प्रसार करण्यात आला. त्याचप्रमाणे प्लेटो व ऑरिस्टॉटल यांच्या तत्वज्ञानाकडे स्टोईकांनी उपहास सोडून प्रथमच सहानुभूतीने पाहिले. या काळाचे प्रतिनिधी पॅनिशस (Panaetius) आणि पेसिटोनिअस. हा स्टोइकवादाच्या परिवर्तनाचा कालखंड होय.


### (3)तिसरा रोमन स्टोइकवादाचा कालखंड :

पुढील 200 वर्षे. अंदाजे ख्रिस्तोत्तर 001 ते 200. या कालखंडात स्टोइकवाद हा लोकमान्य तत्वज्ञान बनला.या कालखंडात मूळ तत्वाचा रोमन स्टोईकांनी यशस्वीपणे व्यवहारात उपयोग करुन दाखविला.त्यामुळे त्या काळात वृध्दिंगत होणा-या धार्मिक भावनेची त्याला जोड मिळाली आणि त्याचा उदात्त नैतिक भावनेच्या स्वरुपात आविष्कार झाला.याचे प्रमुख उद्गाते सेनेका (ख्रिस्तोत्तर 4 ते 65), तत्वज्ञ गुलाम एपिक्टेटस (ख्रिस्तोत्तर 90), आणि सम्राट ऑरेलिअस (ख्रिस्तोत्तर 121 ते 180), हे होते. स्टोईकांनी रोममध्ये त्यांची व्याख्याने दिली. रोम व रोमन साम्राज्याने त्यामुळे वेगवान वैचारिक प्रगती केली.त्यामुळे या कालखंडास *रोमन स्टोइकवाद* म्हणतात.

यातील झीनो हा मूलभूत तत्त्वचिंतक समजला जातो. त्याच्या तत्त्वज्ञानाची ओळख आपण करून घेवू. झीनो वादकलेत अत्यंत निष्णात होता.त्याचे वादविवादातील विरोधाभास (paradoxes)अत्यंत प्रसिध्द आणि लोकप्रिय आहेत. विसाव्या शतकातील भाषेच्या तत्त्वज्ञानाची मुळे झीनोच्या या विरोधाभास संकल्पनेत सापडतात, असे म्हंटल्यास फारसे चूक होणार नाही. भाषा आणि अधिभाषा यात फरक करणे आवश्यक आहे, याचे सूतोवाचच जणू झीनोने केले होते.

## संस्थापक झीनो (Zeno)

**Zeno of Elea** (490 – 430 BC)
a pre- Socratic Greek philosopher
Aristotle called him the inventor
of the dialectic.
He is best known for his
paradoxes



सायप्रस बेटातील सिटियमचा रहिवासी झीनो (Zeno खि.पू. 336-35 ते ख्रि.पू. 264-63 ) हा स्टोइक संप्रदायाचा संस्थापक होय. त्याला सुमारे 72 वर्षाचे प्रदीर्घ आयुष्य लाभले. त्याने बरीच वडिलोपार्जित संपत्ती धंद्यामध्ये गमावली. मग तो बाविसाव्या वर्षी अॅथेन्सला गेला व तत्वज्ञानाकडे वळला. तेव्हा त्याला झेनोफोनचे 'मेमोरॅबिलिया' *(Memorabilia)* आणि प्लेटोचे 'अॅपॉलॉजी' *(Apology)* ही पुस्तके वाचायला मिळाली.ती वाचून त्याच्या मनावर सॉक्रेटीसच्या उदात्त व्यक्तित्वाचा व प्रभावी ठसा उमटला.तेव्हापासून त्याचे मन सॉक्रेटीसविषयी प्रगाढ आदराने भरुन गेले.तो सॉक्रेटीसचा जणू भक्तच बनला.

खि.पू. 294 मध्ये अॅथेन्स शहरातील बाजारपेठेतील रंगविलेल्या मोठया अनेकखांबी सभागृहात त्याने अध्यापनास सुरवात केली.त्यानंतर त्याच्या पंथांचे नाव 'स्टोआ [15]' हे होते.झीनोला उच्च दर्जाची प्रसिध्दी संबंध ग्रीस देशात लाभली. त्याच्या चारित्र्यासंबंधी लोकांना अतिशय आदर वाटत असे आणि त्या आदरास तो पात्रही होता. त्याच्या उदात्त चारित्र्याविषयी अॅथेन्सवासीयांना आणि मॅसिडोनियाचा राजा अॅटिगोनस गोनाटाम याला कमालीचा आदर वाटत असे.तो काटकसरी वृत्तीचा होता.त्याची राहणी कमालीची साधी असे.

झीनोनंतर या संप्रदायाचे नेतृत्व ट्रोडमधील अॅससचा क्लीअॅन्थीस (Cleanthes) याच्याकडे गेले व तो स्टोइक संप्रदायाचा सुमारे 32 वर्षे प्रमुख होता. स्टोइक पंथाच्या नेत्यांमध्ये त्याचेच नाव सर्वांना अधिक परिचित आहे, त्याने स्टोइक तत्वांचा सिध्दान्त मांडला. त्याने सुमारे 705 प्रबंध लिहिले होते असे म्हणतात. त्याचा काळ (खि.पू.331।30 ते खि.पू. 233 ते 231 असावा; पण झेलरच्या मते तो खि.पू. 233।32 हा असावा) त्यानेही स्वेच्छेनेच आपलया जीवनाचा अंत केला.

स्टोइकवादाचा तिस-या नंबरचा तत्ववेत्ता व नेता हा सोलसचा खिसिपस (Chrysippus खि.पू.281।77 ते खि.पू.208।204) हा क्लीन्थेसचा वारसदार आहे.त्याला 73 वर्षाचे दीर्घ आयुष्य लाभले होते.त्याने स्टोइक तत्वज्ञानाचे पुष्कळ साहित्य लिहिले व त्याला व्यवस्थित आकार दिला. त्याने सुमारे 505 वेगवेगळे प्रबंध लिहिले, त्यांपैकी तीनशे प्रबंध तर्कशास्त्रावर होते. दिवसाला कमीत कमी 500 ओळी तरी तो लिहीत असे अशी त्याच्याविषयी ख्याती होती.

खिसिपस उच्च प्रतीचा वादपंडित व विद्वान होता. त्याने विस्तृत लेखन केले; पण ते विस्कळित होते व त्याची मांडणी रेखीव व पध्दतशीर नव्हती.पण त्याचबरोबर ज्या भिन्न प्रवृत्तींमुळे तो संप्रदाय भंग पावणार होता. त्यांना त्याने एकत्र ग्रंथित करुन त्यांपासून सुरचित प्रणाली तयार केली. स्टोइकसंप्रदायात समतोल आणण्यासाठी त्याने महत्वपूर्ण कामगिरी केलेली आहे.

---

[15] त्या खांबांना 'स्टोआ' म्हंटले जात असे.

## स्टोईकांची नियतत्ववादी नीतिमीमांसा :

स्टोईकांचे नीतिशास्त्र नियतत्ववादी आहे.म्हणजे या विश्वात काही विशिष्ट रितीचे नियम असून त्या नियमांना अनुसरूनच माणूस वागत असतो, किंबहुना माणसाला त्या नियमानुसारच वागावे लागते.मानवी नैतिक नियम सुध्दा नियमानुसारच रचले जातात, असे त्यांचे म्हणणे होते. थोडक्यात स्टोईकांचे नीतिशास्त्र त्यांच्या सत्ताशास्त्रीय तत्त्वांवर आधारलेले होते.ती तत्वे पुढील प्रमाणे :

(1) विश्वाचे शासन हे निरपेक्ष अशा नियमाने घडत असते

(2) माणसाचे सारस्वरुप विवेकबुध्दिप्रधान असते.

या तत्त्वांच्या आधारे स्टोइकांनी एक व्यापक मार्गदर्शक तत्व तयार केले. *'' निसर्गाला अनुसरुन जगा.''* असे ते तत्त्व आहे.याचे दोन अर्थ होतात :

(1) व्यापक अर्थाने माणसांनी निसर्गनियमांना अनुसरुन वागावे

(2) मर्यादित अर्थाने माणसांनी सारभूत स्वरुपाशी (विवेकबुध्दीशी) प्रामाणिक राहून वागावे.

स्टोइकांच्या दृष्टीने हे दोन्ही नियम एकच गोष्ट सांगतात; कारण निसर्गाचे व्यापार ही बुध्दिशील नियमनानुसारच चालत असतात. नैतिक सदाचरण हे विवेकबुध्दीस अनुरुप असते. नीती ही केवळ विवेकशील कृती असते. विवेशक्तीच्या आधारेच नीतिनियम ठरतात. याचाच अर्थ नीती नियत होते.ही *नियतत्ववादी नीतिमीमांसा* होय.

*'' निसर्गाला अनुसरुन जगा.''* म्हणजे नेमके कसे जगावे ? 'निसर्गानुसार' याचा अर्थ निसर्गात कार्य करणा-या व मानवी आत्म्यातही वसणा-या नियमानुसार वागणे, असा होतो.स्टोइकांच्या मते नीतीचे ध्येय ईश्वराने घडविलेलया विश्वरचनेस माणसाने शरण जाणे हे होय.स्टोईकांनी नैतिक ज्ञानाचा मनाच्या व संकल्पशक्तीच्या सामर्थ्याशी अत्यंत घनिष्ठ संबंध जोडला आहे.[16] झीनोच्या मते सर्व सदाचारांचे मूळ हे चिंतनात असते; क्लीॲन्थेसच्या मते ते आत्मसामर्थ्यात असते, तर ॲरिस्टोच्या मते ते आत्म्याच्या आरोग्यात असते.

स्टोईकांच्या मते कोणतीही कृती, कृती म्हणून चांगली किंवा वाईट नसते, कारण प्रत्यक्ष शारीरिक कृतीला कोणतेच मूल्य नसते; ती चांगलीही नसते व वाईटही नसते. नैतिक दोष हा कृती करणा-या माणसाच्या इच्छाशक्तीत व हेतूमध्ये असतो.म्हणजे मानवाच्या निवडीत, निर्णयात चांगलेवाईटपणा असतो.म्हणून स्टोइकांचे म्हणणे असे आहे की शहाणा मनुष्य हा नियतीचे अनुकरण समजून, उमजून, जाणून व सहेतुकपणे निवड करुन करीत असतो. म्हणजे माणसाला आपली आंतरिक अभिवृत्ती बदलण्यास स्वातंत्र्य असते. तो शरणागती पत्करु शकतो तसे बंडही करु शकतो. शहाणा मनुष्य उच्च मूल्यांची निवड करण्यास व हीन मूल्यांचा त्याग करावयास स्वतंत्र असतो.

## मुख्य सद्‌गुण

स्टोइकांच्या मतानुसार, ----

[16] सिनिकांच्या आणि स्टोइकांच्या 'निसर्गानुसार जीवनाच्या' कल्पनेचे अर्थ वेगळे आहेत.सिनिकांच्या कल्पनेनुसार नैसर्गिक जीवन हे डायोजिनिस याच्या प्रत्यक्ष आचरणात व्यक्त झालेले पाहावयास सापडते. सिनिक हे निसर्गाचा अर्थ 'रानटी' आणि 'सहजप्रवृत्तिनुसार' असा लावतात व म्हणून 'निसर्गानुसार' या शब्दाचा अर्थ त्यांच्या दृष्टीने सुसंस्कृत समाजाचे संकेत व परंपरा यांना धुडकावून लावणे व काही वेळा जवळजवळ असभ्य आणि विक्षिप्तासारखे वागणे यातही व्यक्त होतो.

1) नैतिक अर्न्तदृष्टी (Moral Insight)
2) धैर्य (Courage)
3) आत्मसंयमन (Self-control) किंवा मिताचार (Temperance)
4) न्याय (Justice)

हे मुख्य सद्‌गुण आहेत. हे सर्व सद्‌गुण एखाद्या व्यक्तीठायी असले तर एकाच वेळी सर्व असतात व नसले तर एकाच वेळी सर्व नसतात; म्हणजे त्यातले काही असतात आणि नसतात असे होत नाही. सर्व सदगुण हे परस्परांशी अशा अविभाज्य रीतीने जोडलेले असतात की शेवटी ते एकाच चारित्र्याचे (Character) आविष्कार ठरतात; आणि म्हणून एक सद्‌गुण असला म्हणजे त्याच्याबरोबर इतरही सद्‌गुण आपोआप येतातच.[17]

स्टोइक हे मुख्यत: चारित्र्यावर भर देतात आणि खरे सद्‌गुणी वर्तन हे आपलया कर्तव्याची पूर्ती करण्यानेच व्यक्त होते. आणि ही गोष्ट त्याच्या योग्य अर्थाने आणि केवळ शहाणा मनुष्यच करु शकतो. शहाणा मनुष्य विकारापासून मुक्त झालेला असतो आणि त्याच्या आंतरिक मूल्यांच्या बाबतीत तो कोणाहीपेक्षा कमी नसतो. तो त्याच्या जीवनाचा संपूर्ण स्वामी असतो; त्याच्या जीवनावर त्याच्या एकट्याचीच मालकी असते, मग वेळ पडलयास तो स्वत:चा अंतही करु शकतो.

सर्व सद्‌गुणांचे मूल्य व महत्व सारखेच असते आणि सर्व दुर्गुणांना समान रीतीने दूषण द्यावयाचे असते. खरे महत्व जर कशाला देणे आवश्यक असेल तर ते शीलाला व चारित्र्याला. चारित्र्य हेच कर्तव्यपूर्तीला सदाचाराचे स्वरुप देते. म्हणजे चारित्र्य किंवा शील हे पूर्णपणे असते किंवा पूर्णपणे नसते. सद्‌गुण आणि दुर्गुण असे गुण असतात की त्यांना कमीजास्तपणा किंवा अंशात्मक फरक माहीत नसतात. त्यांच्या दरम्यान मधला असा कोणताच प्रकार नसतो. म्हणजे सद्‌गुण किंवा दुर्गुण हे आपणांत कमीजास्त प्रमाणात असू शकत नाहीत. म्हणजे एकतर आपण सद्‌गुणी असू नाही दुर्गुणी तरी असू आपण काही प्रमाणात सद्‌गुणी आणि काही प्रमाणात दुर्गुणी असे असू शकत नाही. आपण एकतर शहाणे तरी असू नाहीतर मूर्ख तरी असू.

आणि मूर्खपणापासून शहाणपणाकडे जर स्थित्यंतर व्हावयाचे असेल तर झटकन व एकदम होते; ज्यांची अद्याप प्रगती होत आहे असे म्हणतात ते अद्यापही मूर्खांच्याच वर्गात मोडतात असे म्हणावयास पाहिजे. म्हणजे स्टोइकांची भूमिका ही एकांगी व अतिरेकी आहे. एखादी व्यक्ती संपूर्णपणे सद्‌गुणी असेल; नाही तर एकदम दुर्गुणी असेल. ही दोन अतिरेकाची टोके आहेत. त्या दोघांच्या मधली अवस्था जणू असूच शकत नाही. काही प्रमाणात व काही बाबतीत सद्‌गुण व काही बाबतीत दुर्गुण अशी अर्धवट अवस्था स्टोइकांना मान्य नाही.

## शहाणा मनुष्य (Wise man)

प्रज्ञानी किंवा शहाणा मनुष्य (Wise man) हा पूर्णतेचा आदर्श असतो आणि शहाणपण ही सुखाची एकमेव अट असल्याने शहाणपण मिळविणे हे सर्व सुखाचे ध्येय आहे. सर्व प्रकारची दु:खे आणि दुरात्मता यांचा आदर्श मूर्ख मनुष्य असतो. केवळ शहाणा मनुष्य हाच मुक्त, सुंदर, समृध्द आणि सुखी असतो. त्याच्या ठिकाणी सर्व सद्‌गुण सम्मीलित झालेले असतात आणि सर्व ज्ञान एकत्रित झालेले असते. तो एकटाच सर्व बाबतीत योग्य रीतीने वागत असतो. तो एकटाच खरा राजा, मुत्सद्दी, कवी, प्रेषित आणि कर्णधार असतो. तो गरजा आणि दु:खे यांपासून पूर्णपणे मुक्त असतो आणि तो एकटाच देवांचा मित्र असतो. त्याचा सद्‌गुण तो कधीच गमवू शकत नाही आणि त्याचे सुख कालाबरोबर वाढतही नाही.

---

[17] याच न्यायाने एक दुर्गुण असला की त्याच्याबरोबर इतरही दुर्गुण येतात !

स्टोइकांचे तर असे मत आहे की हाताच्या बोटावर मोजण्याइतकी अगदी थोडी अपवादात्मक माणसे सोडल्यास जवळजवळ सर्वच माणसे मूर्ख असतात. फार मोठी कीर्ती लाभलेले मुत्सद्दी व प्रतापी लोकही भावनांच्या प्रभावाला बळी पडतात, मात्र त्यांचे प्रमाण इतरांपेक्षा कमी असते एवढेच.[18]

## स्टोइक आणि सिनिक यांची तुलना :

खरे म्हणजे स्टोइकांचे तत्वज्ञान हे सिनिक तत्वज्ञानाशी बरेच समान असले तरी त्याच्यापासून वेगळेही आहे; याचे कारण त्यांनी वैज्ञानिक पध्दतीचा स्वीकार केला आहे.सिनिकांच्या तत्वांना काही बाबतीत मुरड घालून अधिक सौम्य व मर्यादित करण्याची आवश्यकता आहे ही गोष्ट झीनो दृष्टिआड करु शकला नाही.

सिनिक तत्वज्ञानातील उग्रता व कठोरता कमी करुन त्यांना सौम्य करण्याशिवाय स्टोइकांना त्यात सुधारणा करुन प्रगती करता येत नव्हती.म्हणून नैतिक दृष्टया मूल्यरहित असलेलया चांगलया गोष्टीचे स्टोइकांनी तीन प्रकार केले, ते असे-

1. जे निसर्गानुसार आहेत व म्हणून ज्यांना मूल्य (Value) आहे, आणि म्हणून जे एषणीय (Desirable) आहेत व ज्यांची केवळ स्वत:करिताच निवड करावयाची असते.
2. जे निसर्गाच्या विरुध्द आहेत व म्हणून ज्यांना मूल्य नसते व त्यासाठी जे टाळावयाचे असतात.
3. ज्यांना मूलय नसते आणि त्याच्या विरुध्दही काही नसते, जे मूल्यविरहित (Adiaphora) असते.

आपली तत्वे सिनिकाप्रमाणे फार कडक व उग्र ठेवून चालणार नाही हे स्टोइकांनी ओळखले. म्हणून त्यांना ‘पूर्ण कर्तव्य’ (Perfect Duties) आणि ‘मध्यम कर्तव्ये’ यात फरक केला. ज्यांना आदर्श रीतीने पूर्ण कर्तव्ये करता येत नाहीत अशांकरिता आचारण्यास शक्य होतील अशी कर्तव्ये उपलब्ध करुन दिली पाहिजेत याची जाणीव स्टोइक तत्ववेत्यांना होती.

शहाणा मनुष्य चांगलया व वाईट दोन्ही गोष्टींविषयी एक प्रकारची उदासीनता (Apathy) बाळगतो; पण त्याची उदासीनता सुध्दा त्याला परिसीमित करावी लागते.म्हणजे शहाण्या माणसावरही भावना आणि विकार प्रभुत्व गाजवण्याचा प्रयत्न करीत असतात; तो त्या भावनांचे जरी निराकरण करीत नसला तरी तो त्यांना संमतीही देत नाही. पण केवळ त्याच्यामध्येच काही समंजसपणाच्या भावना असतात म्हणजे स्टोइकांनी प्रज्ञानी (शहाणे-Wise) आणि मूर्ख (Foolish) लोक या दोघांच्या दरम्यान जे कोणी ‘प्रवीण’ असतात त्यांना सामावून घेण्यासाठी त्यांच्यासाठीही काही कर्तव्ये असू शकतात हे मान्य केले आणि त्यांचे महत्व इतके वाढविले की शहाण्या लोकांपासून त्यांना ओळखताही येऊ नये.

सिनिक आणि स्टोईक यांच्या नंतरचा महत्वाचा तत्त्वचिंतक म्हणजे एपिक्युररियन संप्रदाय होय. एपिक्युरसने तो स्थापन केला. भारतीय दर्शन परंपरेतील चार्वाक दर्शनाची तुलना या संप्रदायाशी करता येईल. अर्थातच दोन्हीमध्ये महत्वाचे फरक आहेतच. एपिक्युरसने सुखवादाची मांडणी केली, पण ती अतिरेकी सुखवादी नव्हती. ती संयमित आणि उच्च दर्जाचे जीवन साकारणारी होती.


सुखवादाचा पुरस्कार करताना एपिक्युरस भावना-मुक्तीचा सल्ला देतो.यासाठी तो Ataraxia चा सिध्दान्त मांडतो.

---

[18] या उलट झेलर म्हणतो की मूर्ख मनुष्य हा पूर्णपणे वाईट व दु:खी असतो; तो अज्ञानी, भिकारी व गुलाम असतो. सर्वच मूर्ख वेडे असतात.

# एपिक्युरिअन संप्रदाय

**Epicurus** (341 – 270 BCE)
ancient Greek philosopher
and
the founder of the school
of philosophy
called Epicureanism.



एपिक्युरसचा जन्म ख्रिपू. 341 मध्ये आशिया मायनरमधील सॅमोस येथे झाला. पण तो गार्गेटस या ठिकाणचा कायमचा रहिवासी बनल्याने त्याला *'गार्गेटसचा मुनी'* म्हणतात. त्याच्या वडिलांचे नाव निओक्लिस (Neocles) असून आईचे नाव चारेस्ट्राटा (Chaerestrata) होते.वडिल शिक्षक होते तर आई धार्मिक असून रोग, आजार व दुदैवी घटना टाळण्यासाठी व देवतांना प्रसन्न करण्यासाठी काही अंशी जादूटोण्याचे विधी करीत असे.

एपिक्युरसने सुसंस्कृत आणि नाजूक अशा सुखवादाचा पुरस्कार केला.तो फार लोकप्रिय ठरला. त्याने ख्रि. पू. 310 मध्ये त्याचे स्वतंत्र विद्यालय सुरु केले; नंतर त्याने ते लॅम्पॅस्कसला हलविले व शेवटी ख्रि. पू. 306 मध्ये अॅथेन्स नगरीत नेले.अॅथेन्सला अॅकॅडेमीच्या रस्त्यावर भिंतींनी वेढलेलया एका बागेत त्याने आपले विद्यालय आणि संप्रदाय सुरु केला. पुढे तेच त्याचे प्रमुख केंद्र बनले आणि त्याचे घर आणि भोवतालची बाग त्याने त्याच्या शिष्यांना देऊन टाकली. या बागेमुळे त्याच्या अनुयायांना *'उपवनातील तत्वज्ञ'* हे नाव पडले. त्याच्या हयातीत आणि मृत्यूनंतरही त्याचे अनुयायी त्याला कमालीचा आदर व प्रेम दाखवीत. त्याच्याविषयी लोकांच्या मनात जवळजवळ 'दैवी आदर' वसत असे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.

## लेखन

डेमॉक्रिटस,प्लेटो व ऑरिस्टॉटल यांच्याप्रमाणेच तो अविश्रांतपणे भरपूर लेखन करणारा होता. त्याने तत्वज्ञानावर सुमारे 300 प्रबंध लिहिले होते व ख्रिसिपसपेक्षाही त्याने जास्त लिहिले होते असे म्हणतात. त्याने निसर्गाविषयी (On Nature) सुमारे 37 प्रबंध लिहिले होते.त्याच्या एका प्रबंधाचे शीर्षक *'सामान्यनियम'* (Canon) असे आहे; त्यात त्याने आपली ज्ञानशास्त्रविषयक उपपत्ती मांडलेली आहे. त्याच्या इतर लेखनामध्ये त्याने तीन नीतिशास्त्रीय विषयांवर लेखन केलेले आहे. ते असे :

1) *'सर्वोच्च शिवाविषयी'* (On the highest Good)
2) 'कशाची आकांक्षा धरावी आणि काय टाळावे? ' (What is to be sought and avoided ?)
3) 'जीवनांवर' (On lives).

लांबचे मित्र व परिचितांबरोबर त्याचा पत्रव्यवहारही सतत चालू असे. तो राजकारणापासून अलिप्त आणि एकांतात राहात असला तरी त्याचा त्या काळातील थोर विचारवंतांशी घनिष्ठ संबंध असे.

एपिक्युरसचे व्यक्तिमत्व आकर्षक व वागणूक सोज्वळ, प्रसन्न असल्याने त्याच्या भोवती मित्र व प्रशंसकांची गर्दी जमे; त्यांच्यामध्ये स्त्रिया व गुलामांचाही अंतर्भाव असे. त्याच्या व्यक्तित्वाची दोन मुख्य वैशिष्ट्ये

म्हणजे एकतर एपिक्युरसची राहणी अत्यंत साधी व मितव्ययी होती.त्याचे भाकरी व पाणी एवढयावरही भागत असे. अत्यंत कमी खर्चात व थोडया गरजांनी जगता येणे हा त्याचा आदर्श होता.काटकसरीने जगण्याचे त्यांनी विविध प्रयोग केले होते.

दुसरे महत्वाचे लक्षण म्हणजे त्याचे वैराग्य आणि निष्काम कर्माचे आकर्षण. मानसन्मानाची हाव, महत्वाकांक्षा यांचा संपूर्ण अभाव एपिक्युरसच्या स्वभावात सापडतो आणि त्याचे विद्याव्यासंगाचे प्रेम, चिंतनशीलता आणि निवृत्तिप्रियता विशेष होती.

एपिक्युरिअन संप्रदायाचे सदस्य हे एकजुटीने व एकमताने राहात.त्यांच्यात आपसात मतभेद व स्पर्धा यांचा अभाव होता.त्यांचा गुरु एपिक्युरस याच्याविषयी त्यांना कमालीचा आदर व प्रेम होते.

## सुखवाद : नीतिशास्त्र

एपिक्युरसच्या मते सर्व कृतीचे लक्ष्य मानवी व्यक्ती असते.जगातील चांगले व वाईट, शिव व दुरित यांचे मूल्यमापन करण्याचे प्रमाण व निकष माणसाचे 'भाव' (Feelings) असतात, असे त्याचे मत आहे.सर्व माणसे जर कोणत्या एकाच ध्येयासाठी, एकाच उद्दिष्टासाठी धडपडत असतील तर ते म्हणजे सुख-प्राप्ती होय. आणि माणसे जर सतत काही टाळत असतील तर ते म्हणजे दु:ख होय.म्हणजे एपिक्युरस सुखाला (Pleasure) जीवनाचे खरे व अंतिम ध्येय समजतो व दु:खाला (Pain) दुरित समजतो . जीवनात जर कशाचा माणसाने सतत पाठपुरावा करावयाचा असेल तर तो शुध्द, टिकाऊ व शांतिप्रदान करणा-या सुखाचा होय असे एपिक्युरसचे मत होय.म्हणून आधुनिक परिभाषेत बोलायचे झाल्यास एपिक्युरस हा स्वसुखवादाचा किंवा स्वकेंद्रित सुखवादाचा (Egoistic hedonism) पुरस्कर्ता आहे.[19]

## गंभीर विवेकी सुखवाद : सौम्य वैराग्य

सुख (Pleasure) हे सदैव चांगले व शिव (Good) असते व दु:ख हे नेहमीच वाईट किंवा दुरित (Evil) असते पण त्याचबरोबर सुखाची नेहमीच निवड करावयाची असते आणि दु:खाचा नेहमीच त्याग करावयाचा असतो असे मात्र नाही, या भूमिकेपासून एपिक्युरस कधीही ढळत नाही.कारण अनुभवावरुन असे दिसते की काही सुखांचे परिणाम दु:खदायक असतात आणि काही दु:खाचे पर्यवसान सुखद अवस्थेत होते; म्हणून कोणतीही कृती करण्याचा निर्णय घेण्यापूर्वी तिच्या परिणामांचे योग्य असे मूल्यमापन किंवा तुलना (Weigh) केले पाहिजे.

एपिक्युरस हा सुखवादी असला तरी तो सुखाची निवड करताना तारतम्य सोडत नाही. सर्वच सुखे सारख्या दर्जाची असतात असे त्याचे म्हणणे नाही.विषयासक्त भोगी माणसांची सुखे ही जरी सुखे असली तरी त्यांची उच्च प्रकारच्या सुखांशी तुलना होऊ शकत नाही.केवळ सतत खाणे, पिणे, चैन करणे व विषयोपभोग घेणे यामुळे जीवन सुखी होत नसते.

एपिक्युरसची सुखाविषयीची दृष्टी उथळ व थिल्लर नाही.तो सुखांचा जरी भोक्ता व पुरस्कर्ता असला तरी ज्यायोगे चित्ताला स्थिरता, शांती, प्रसन्नता, यांचा लाभ होऊन ते स्वस्थता व आनंद अनुभवू शकेल असे सुख तो महत्वाचे समजतो.सुख व दु:ख यांचा योग्य प्रमाणात विचार करुन मानवाने आपलया इच्छा व आकांक्षा यांची अशी जुळणी करावी व अशा कृती कराव्या की ज्यामुळे जास्तीत जास्त प्रमाणात त्रास, वेदना, व्यथा, दु:ख येईल; असा हा एपिक्युरअन नीतिविषयक दृष्टिकोन '*सौम्य वैराग्याचा' व विवेकी संयमाचा* पुरस्कार करतो.केवळ क्षणिक व उत्कट अल्पकालीन सुखाचा विचार करण्याऐवजी दीर्घकाळ टिकणा-या व चित्ताची स्वस्थता टिकविणा-या

[19] एपिक्युरस, हा सायरेनिक पंथांचा संस्थापक ॲरिस्टिपस याच्याशी 'सुख हेच शिव' या मताशी सहमत आहे.म्हणजे एपिक्युरस सुख हे श्रेयस् किंवा शिव (Good) याच्याशी एकरूप असते असे मानतो.

सुखाचा विचार केला पाहिजे असे एपिक्युरसचे मत आहे.त्यासाठी माणसाने आपल्या गरजा व इच्छा यांना मर्यादा घालून त्या कमीत कमी केल्या पाहिजेत आणि अत्यावश्यक तेवढ्याच इच्छा ठेवून कमीत कमी वस्तूंचा वापर करुन जास्तीत जास्त काटकसरीचे जीवन जगले पाहिजे अशी त्याची शिकवण आहे.

साधेपणा, मिताचार, संयम, प्रसन्नता, यांसारखे सद्‌गुण हे सुखास पोषक व उत्तेजक असतात; उलट बेसुमार भोगवृत्ती, दुर्दम्य महत्वाकांक्षा, अहंकारित्व इत्यादी वृत्ती चित्तसंक्षोभ करणा-या असलयाने सुखास प्रतिकूल व घातक असतात.म्हणून एपिक्युरस म्हणतो, 'दूरदर्शित्व, न्याय आणि सन्मान यांशिवाय सुखाने जगता येणार नाही आणि सुखाशिवाय दूरदर्शित्व, न्याय आणि सन्मान यांनी मुक्त असे जीवन जगता येणार नाही.

एपिक्युरसचा नीतिसिध्दान्त त्याने मेनोसिअसला पाठविलेलया पत्रात व्यक्त झाला आहे. एपिक्युरसचा सुखवाद हा सुखाच्या अविवेकी प्रवृत्तींचे समर्थनात्मक सयुक्तीकरण (Rationalisation) नसून तो बुध्दिवादाच्या दृढ पायावर आधारलेला सुरचित असा आदर्शविषयक सिध्दान्त आहे.

## आत्म्याचे सुख Ataraxia

सुखवादाचा पुरस्कार करताना सुध्दा एपिक्युरस भावना-मुक्तीचा सला देतो. माणसाचे आंतरिक जीवन, विशेषत: समाधानी व प्रसन्नवृत्ती ही बाह्य परिस्थितीवर अवलंबून ठेवता कामा नये, यावर त्याचा अधिक कटाक्ष आहे. यासाठी एपिक्युरसने वापलेला शब्द Ataraxia असा आहे; त्याचा अर्थ प्रशान्तता, प्रसन्नता (Serenity), शांती (Peace), स्वस्थता (आराम-Repose), अक्षोभा, अनुद्विग्नता (Imper-turbaility) या विविध शब्दांनी व्यक्त होतो.बाहय जगावर माणसाचे नियंत्रण चालत नाही म्हणून निदान माणसाचे आपल्या चित्तावर होणा-या परिणामावर तरी नियंत्रण चालवावे. कारण हे परिणाम चित्तक्षोभाच्या स्वरुपाचे असतात. त्यामुळे मानसिक शांतता ढळते. अशा भावनिक परिणामावर प्रभुत्व प्रस्थापित केल्याने मनुष्य जगापासून स्वतंत्र बनतो.

एपिक्युरस भावना आणि इच्छांच्या नियमनाचा जरी पुरस्कार करीत असला तरी माणसाने वैराग्याकडे वळावे, हे सांगत नाही. तो क्षुधांचे व इच्छांचे व त्यांच्याबरोबर निर्माण होणा-या सुखांचे तीन प्रकार करतो :

## सुखांचे प्रकार :

(1) नैसर्गिक व अपरिहार्य क्षुधा . ( म्हणजे ज्यांची तृप्ती झालयाशिवाय जगणे अशक्य होते अशा क्षुधा.)
(2) कृत्रिम आणि टाळता येण्यासारख्या क्षुधा व गरजा (अशा क्षुधांकडे नेहमी दुर्लक्षच केले पाहिजे.)
(3) ज्या नैसर्गिक असूनही टाळता येण्यासारख्या असतात अशा क्षुधा.

तिसऱ्या प्रकारच्या क्षुधांपासून मिळणाऱ्या सुखाचे स्थान वरील दोन प्रकारच्या क्षुधांच्या दरम्यान असते व या पुष्कळ असतात. नेमक्या कोणत्या आहेत हे ठरविण्यासाठी एक प्रकारची अन्तर्दृष्टी लागते; कारण गरज पडल्यास त्यांचा संपूर्ण त्यागही करता येतो. पण त्या सुख देत असल्याने शक्यतोंवर त्यांची तृप्ती करण्यासाठी शहाणा मनुष्य प्रयत्नही करतो. एपिक्युरसला अभिप्रेत असलेलया सुखाप्रत जाण्यासाठी खालील तीन पायऱ्या आहेत -

(1) अतृप्त तृष्णांची इच्छा किंवा दु:ख.
(2) अतृप्त इच्छांच्या दु:खांचे अपहरण करणारे भावात्मक सुख.
(3) आत्म्याचे स्वास्थ्य किंवा आराम ( खरे सुख Ataraxia).

## सद्गुण : सुखाचे केवळ साधन

एपिक्युरसच्या मते सद्गुण व सुख यांचे साहचर्य असते. पण सद्गुण हे सुखाचे केवळ साधन याच अर्थाचे साहचर्य आहे. कारण सद्गुणाबरोबरच सुख हे नेहमी अपरिहार्यपणे जोडलेले नसते; पण त्याचबरोबर सुखप्राप्तीसाठी सद्गुणाचा आचार ही आवश्यक अशी एक अट मात्र ठरतो.

# प्रज्ञानी Wise Man

एपिक्युरसचा आदर्श प्रज्ञानी (शहाणा मनुष्य - Wise Man) अंतरंगात तृप्त, शांत, समाधानी, प्रसन्न, अक्षुब्ध, अनुद्विग्न, स्वस्थ व आराम अनुभवणारा सुखी मनुष्य असतो.त्याचे सुख किंवा आंतरिक समाधान, तृप्ती, संतोष व प्रसन्नता ही बाह्य जगतातील गोष्टींवर अवलंबून नसतात.तो बाह्य जगाच्या प्रभावापासून मुक्त व स्वतंत्र असतो.तो संकटे, आपत्ती, गैरसोयी आणि अस्वस्थता निर्माण करु शकणा-या परिस्थितीतही शांत, अनुद्विग्न व प्रसन्न राहून हसतमुखाने दु:खे सहन करीत असतो.

एपिक्युरिअन प्रज्ञानी किंवा शहाणा मनुष्य हा या जगाचा एक केवळ प्रेक्षक (Spectator) असतो. तो या जगाच्या कार्यात उतरत नाही किंवा या जगात नीतीसाठी जी युध्दे लढविली जातात त्यांत एक सैनिक म्हणून तो सामीलही होत नाही. त्याच्या सामाजिक संबंधांना त्याचे वैयक्तिक स्वातंत्र्य एक वेगळेच रुप देते. या जगात तो आसक्तीचे बंध तयार होऊ देत नाही, कारण त्यात फार गुंतागुंती असतात.शिवाय त्याच्या अंतर्यामी बलशाली शिव असते आणि त्याच्या अशिव प्रवृत्ती दुर्बल झालेल्या असतात एवढेच काय ते त्याचे समाधान.

राजकीय स्वातंत्र्याकडे तो एक स्वार्थी सोय या दृष्टीने पाहातो.तो नागरी जीवनाचा विरोधक असतो आणि म्हणूनच निरंकुश शासनास त्याचा पाठिंबा असतो. तो विवाहाची जबाबदारी पत्करण्यास नकार देतो. मैत्रीमध्ये उभयपक्षी लाभ होत असलयाने तो मैत्रीस एकमेव योग्य सामाजिक संबंध म्हणून मान्यता देतो. त्याच्या मते मैत्री म्हणजे बौध्दिक समागम, करुणा आणि क्षमाशीलता असते.

## टीका व परीक्षण

आपण काही सुखांना चांगले समजून त्यांचा स्वीकार करतो व काही सुखे हलक्या प्रतीची व वाईट म्हणून त्यांचा अव्हेर करतो; असे का होते? सुख व श्रेयस ही जर एकच असतील तर मग मानवाच्या आयुष्यात श्रेयसच्या किंवा शिवाच्या (Good) प्राप्तीसाठी काही वेळा मानसिक संघर्षाला तोंड देऊन सुखाचा त्याग करुन शिवाचे अनुष्ठान का करावे लागते ? कोणत्याही सुखवादी भूमिकेस या प्रश्नाला तोंड द्यावेच लागते.

प्लेटोच्या 'प्रोटॅगोरास' या संवादात सॉक्रेटीस म्हणतो की प्रत्येक मनुष्य त्याला जे सर्वोत्तम वाटते त्याची इच्छा करतो आणि सुखासच शिव किंवा श्रेयस् समजतो आणि दु:ख हे वाईट किंवा दुरित समजून ते टाळण्याचा प्रयत्न करतो. तो ज्यामुळे सुखापेक्षा अधिक दु:खच निर्माण होते असे सुख टाळतो व जे दु:ख भोगूनही अधिक सुखाची प्राप्ती होणे शक्य होते त्या दु:खाचाही स्वीकार करतो.सॉक्रेटीसच्या या भूमिकेशी एपिक्युरस सहमत होता.

एपिक्युरसची सुखाविषयीची कल्पना अतिशय विकसित व सुसंस्कारित, अभिरुची आणि उदात्त भावना यांनी परिपूर्ण अशी संस्कृती गृहीत धरते.असा मनुष्य समाजात एक परजीवी बनून इतरांच्या श्रमांवर जगत असतो. एपिक्युरिअन आदर्श व्यक्तींना भरपूर देतो परंतु आध्यात्मिक सर्जनास साधनभूत होणारे असे मात्र समाजास काहीही पुरवीत नाही.

**********************************